# प्रकरण पहिले

## प्र स्ता व ना

## प्रकरण पहिले

## प्रस्तावना

भारतीय राजकीय प्रक्रियेच्या संदर्भात एक पक्ष प्रबळ पध्दती हे राजकीय विचारवंताच्या अभ्यासाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरला आहे. त्यामध्ये एकपक्ष प्रबळ पध्दतीचा विचार हा भारतातील कॉंग्रेस पक्षाच्या संदर्भातच प्रामुख्याने केला गेला आहे.[१] अलिकडच्या काळात साधारणत: १९७१ च्या नंतर या एकपक्ष प्रबळ पध्दतीमध्ये काही बदल घडत आले. एक म्हणजे १९६९ च्या विधानसभा निवडणूकीत कॉंग्रेसला उत्तरेकडील जवळ जवळ आठ राज्यात पराभव पत्करावा लागला. त्यानंतर १९६९ मध्ये पहिल्यांदा कॉंग्रेस पक्षामध्ये फूट पडली व १९६९ नंतर देश पातळीवर कॉंग्रेस संघटनेत देश तसेच राज्य पातळीवर गटबाजी निर्माण झाली. गटबाजीच्या संदर्भात विश्लेषण करत असताना अमेरिकन राजकारणावरील एक प्रसिध्द अभ्यासक व्ही.ओ.की. यांनी असे म्हटले आहे की, "एक पक्ष पध्दतीत गटबाजी असे एक मुख्य रचनात्मक माध्यम असते की तिच्याद्वारे या पक्ष पध्दतीतीत राजकीय प्रक्रियेमध्ये फेरबदल घडून येवू शकतात." त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील प्रसिध्द राजकीय विचारवंत मेरी कॅरॉस यांचे असे म्हणणे आहे की व्ही.ओ.की. यांचा अमेरिकन एक पक्ष पध्दतीमधील गटबाजीचा अनुभव भारताच्या संदर्भातसुध्दा लागू पडतो. कारण भारतात सुध्दा १९७० पर्यंत एक पक्ष प्रबळ पध्दतीच होती.[२] भारतातील एक पक्ष प्रबळ पध्दती व ती कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीमुळे बदलत गेलेले तिचे स्वरूप तपासण्याचा प्रयत्न आणखी एक अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ डॉ.पॉल ब्रास यांनी केला आहे. कॉंग्रेसमधील गटबाजीचा अभ्यास करताना उत्तर प्रदेशातील कॉंग्रेसमधील गटबाजी त्यांनी डोळ्यासमोर ठेवली.

यामध्ये त्यांनी प्रामुख्याने राज्यपातळी तसेच जिल्हा पातळीवरील कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीचा प्रामुख्याने विचार केला आहे. त्यांच्या मते गटबाजीची कारणे ही वैयक्तिक राजकीय महत्त्वाकांक्षा यातच आहेत.[३]

१९५७ च्या निवडणूकीत पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेसला मतदारांनी जबरदस्त तडाखा दिला तो सोडला तर स्वातंत्र्योत्तर काळात १९७७-७८ च्या सार्वत्रिक निवडणूकीपर्यंत महाराष्ट्र हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला होता. देशाच्या बहुतेक भागात कॉंग्रेस पक्ष हा वरचढ होता व विरोधी पक्ष इतके कमकुवत होते की, भारतीय राजकीय व्यवस्थेचे वर्णन एकपक्ष प्रबळ पध्दती असे केले जात असे इतर राज्यातील सत्तारूढ कॉंग्रेस पक्षात राजकीय दृष्टयाव वरचढ असलेल्या दोन किंवा दोहोहून जास्त जाती राजकीय सत्तेसाठी स्पर्धा करीत असल्याने अस्थिरता निर्माण होऊ त्यातून नेतृत्व बदल घडून येइ. महाराष्ट्रातील कॉंग्रेस मराठा-कुणबी या जातीगटाशी एकरूप होती. दुसरी अशी प्रबळ जाती नव्हती. त्यामुळे कॉंग्रेस स्थीर राहिली. महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षात गटबाजी असली तरी सौदेबाजी करून मतभेद व स्पर्धा काबूत ठेवणे फारसे कठीण गेले नाही. जुन्या मुंबई इलाख्यात मराठा-कुणबी जाती गटाचे प्रमाण २७% होते. नंतर दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांचे विलिनीकरण झाल्यावर स्वातंत्र्योत्तर काळात ३३% पर्यंत गेले. द्विभाषिक मुंबई राज्यात मराठवाडा व विदर्भ सामील झाल्यानंतर १९५६ ला हे प्रमाण आणखी वाढले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्रीपद यशवंतराव चव्हाणांनी मिळविले. त्यावेळी यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस संघटना संपूर्णत:आपल्या ताब्यात आणली. १९६० साली द्विभाषिकातून गुजरात अलग झाल्याने कुणबी मराठा जाती गटाचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण ४० ते ४५% होते. म्हणूनच

"महाराष्ट्र राज्य की मराठा राज्य" असा प्रश्न महाराष्ट्र निर्मितीचे वेळी विचारला गेला.

हे मराठा - कुणबी जाती वर्चस्व त्यांच्या हाती असलेला जमिनीमुळे १९७७ पर्यंत टिकले. तसेच शहाण्णव कुळी देशमुख देसाई विरूद कुणबी किंवा माळी अगर लेवा पाटील असे राजकारण स्थानिक पातळीवर दिसत असले तरी १९७७ ते १९७८ पर्यंत राज्यपातळीवर दिसले नाही. अन्य जातींनी आजपर्यंत इतर जाती गटांनी कुणबी - मराठा यांनी जाणवण्याजोगे आवाहन न दिल्याने मराठा-कुणबी सर्वत्र समप्रमाणात राहू लागले. तसेच त्यांच्या हाती असलेल्या जमिनी, संलग्न व्यवसाय, पतसंस्था सहकार इ. संस्था या जाती गटाच्या ताब्यात राहिल्या त्यामुळे ग्रामीण भागाच्या राजकारणावर जवळ जवळ दोन दशके वर्चस्व राहिले.

महाराष्ट्राच्या राजकारणावर कॉंग्रेस पक्षाची जरी पकड असली तरी या पक्षात अंतर्गत गटबाजी विविध प्रश्नाला धरून अस्तीत्वात होती असे दिसुन येते. महाराष्ट्राच्या कॉंग्रेस पक्षाच्या गटबाजीच्या संदर्भात अनेक राजकीय विचारवंतानी आपले विचार मांडले आहेत. यामध्ये प्रामुख्याने मेरी कॅरास, डोनाल्ड रोझनथॉ व डॉ. बी.एस. बावीसकर यांचा समावेश होतो. मेरी कॅरास यांच्या मते महाराष्ट्रातील गट-बाजीच्या पाठीमागे प्रामुख्याने आर्थिक घटक उभे आहेत.[४] त्याच प्रमाणे पूढे म्हणतात की ह्या आर्थिक घटकांचा संबंध ब-याच प्रमाणात वैचारिक घटकांशी सुध्दा आहे. कॅरासच्या मते कॉंग्रेसमधील गटबाजी ही त्या पक्षातील आर्थिक विचारांच्या संदर्भात असलेल्या गोंधळातून निर्माण झालेली आहे. म्हणजे सारांश ध्याने आर्थिक आणि वैचारिक घटक हेच कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीस जबाबदार आहेत. असे कॅरासचे म्हणणे आहे.

हे आर्थिक आणि वैचारीक क्षेत्रातील मतभेद कॅरास म्हणतात, त्याप्रमाणे दोन प्रमुख प्रवाहातून राजकीय क्षेत्रात झिरपत येतात. एक म्हणजे आर्थिक क्षेत्र ज्यामध्ये आर्थिक साधनांच्या नियंत्रणाचा प्रश्न अंतर्भूत असतो आणि दुसरा राजकीय क्षेत्र ज्यामध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण आणि कृषि संवादाचा अंतर्भाव होतो. कॅरास यांनी कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीचा अभ्यास करताना महाराष्ट्रातील चार जिल्हयांचा अभ्यास केला. गटबाजीचे विश्लेषण करत असताना कॅरास यांनी जाती किंवा जमातींच्या घटकांचा फारसा विचार केलेला दिसत नाही. याउलट आर्थिक आणि वैचारीक घटकांचा जास्त विचार केलेला आहे. परंतु महाराष्ट्रातील राजकारणावरील मराठा जातीची पकड लक्षात घेता जाती जमातीच्या घटकांना कमी लेखाने विशेषत: जिल्हा पातळीवरील गटबाजीच्या राजकारणात कमी लेखाने बरोबर होईल का ? असे कॅरास म्हणतात.

महाराष्ट्रातील जिल्हा पातळीवरील कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीचा अभ्यास करणारे दुसरे महत्त्वाचे विचारवंत म्हणजे रोझम थॉल हे होत. त्यांनी महाराष्ट्रातील कोल्हापूर व पूणे जिल्हयातील कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीचा अभ्यास केला आहे.[५] या अभ्यासाच्या त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की कॉंग्रेस अंतर्गत गटबाजी ही भिन्न वर्गीय हितसंबंधातून किंवा भिन्न विचारसरणीतून निर्माण होत नसून गटबाजीच्या राजकारणाला प्रभावीपणे प्रेरणा देण्यासाठी व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेचा मोठा वाटा असतो. म्हणजेच कॅरास यांच्या युक्तिवादाला खोडून काढण्याचा रोझन थॉल प्रयत्न करतात ते पूढे म्हणतात, कॉंग्रेस ही एक राजकीय संघटना आहे. त्यामुळे सत्तांसंपादन करण्यासाठी कॉंग्रेस प्रयत्न करणार. हया पक्रियेतुन कॉंग्रेस अंतर्गत गट निर्माण होणारच म्हणून विविध आर्थिक धोरण असलेल्या गटांचे कॉंग्रेसने स्वागतच केले आहे. कॉंग्रेसने सत्ता संपादन करणे हे ध्येय पूढे

ठेवल्यामुळे कॉंग्रेस अंतर्गत वर्गीय मतभेदांना सामावून घेतले आहे. हे मतभेद टोकाला जावू दिले नाहीत.[६]

जिल्हा पातळीवर कॉंग्रेस अंतर्गत अभ्यास करणारे शेवटचे अभ्यासक डॉ. बी.एस. बावीसकर हे होत. बावीसकरांनी अहमदनगर जिल्हयातील कोपरगाव तालुक्यातील शिर्डी मतदार संघातील कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीचा अभ्यास केला. यासाठी त्यांनी १९६७ च्या विधानसभा निवडणूकीचा आधार घेतला. बावीस करांच्या मते गट हे बहुधा स्थानिक स्वरूपाचे असतात. याउलट पक्ष हे राष्ट्रीय प्रश्नावर आधारीत निवडणूक व राष्ट्रीय प्रश्नावर आधारीत निवडणूक हया दोहोमधील फरक स्थानिक लोकांना चांगलाच माहित असतो. कारण आपण बघतो की स्थानिक लोक गटबाजीवर आधारीत असलेल्या निवडणूकांना गटबाजीच्या निवडणूका असे म्हणतात. तर लोकसभेच्या निवडणूकांना किंवा राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या निवडणूकांना हे लोक राजकीय निवडणूका मानतात.[७] बावीसकर आपल्या अभ्यासात पूढे स्पष्ट करतात की गटबाजीच्या राजकारणातील व्यक्ती व प्रभुती यात प्रामुख्याने जातीतीलच असतात. म्हणजे दोन्ही गटांचे नेते हे मराठा जातीचेच असतात आणि त्यांचे असे म्हणणे आहे की हे चित्र महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कमी अधिक प्रमाणात सगळीकडे आढळते.[८] बावीसकर दुसऱ्या अभ्यासामध्ये असे म्हणतात, सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणूका व राजकीय पक्षाचे राजकारण यांच्याशी संबंध जोडतात. त्यांच्यामते सहकारी संस्था हया कॉंग्रेसच्या दृष्टिकोनातून फायदेशीर ठरलेल्या आहेत.[९] पण पूढे ते असेही म्हणतात की सहकारी संस्था हया कॉंग्रेसच्या दृष्टीने नेहमीच वरदान ठरतात असे नाही. जशा सहकारी संस्था कॉंग्रेसला पाठबळ आणि फायदेशीर आहेत त्याच प्रमाणे त्या कॉंग्रेस पक्षात गटबाजी निर्माण करू शकतात. साखर कारखाने व बँका या वरील नियंत्रण प्रस्तापित करण्याच्या स्पर्धेतून

महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षात विभाजन झाल्याची उदाहरणे आपल्याकडे आहेत. अद्याप अशा प्रकारचा अनुभव उत्तर प्रदेशातील काही जिल्ह्यात आढळून येतो. सहकारी संस्थांच्या निवडणूकीत मंत्री, नेते हे हस्तक्षेप करतात.[१०]

वरील अभ्यासकांच्या विश्लेषणातून खालील गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे काँग्रेस अंतर्गत गटबाजीचा आधार वैचारीक, आर्थिक त्याचप्रमाणे वैयक्तिक महत्त्वांकांक्षा आणि गटबाजीवर विशेषत: एकाच जातीचे वर्चस्व इत्यादी गोष्टी स्पष्ट होतात. दुसरे म्हणजे जिल्हा पातळीवरील गटबाजीमध्ये सहकारी संस्था आणि गटबाजीचे राजकारण यामध्ये सरमिसळ असते हे सुध्दा वरील अभ्यासातून स्पष्ट होते.

वरील अभ्यासाच्या पार्श्वभूमीतून कोल्हापूर जिल्ह्याच्या काँग्रेस अंतर्गत गटबाजीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधात केला आहे. प्रस्तुत प्रबंधात खालील प्रश्नांची चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) कोल्हापूर जिल्ह्याच्या काँग्रेसचा राजकीय विकास लक्षात घेता या जिल्ह्यात काँग्रेसचे किती गट निर्माण झाले ह्या गटांचे स्वरुप व व्याप्ती काय ?

२) ही गटबाजी निर्माण होण्याची कारणे कोणती ? उदा. कोल्हापूर जिल्ह्यातील गटबाजी निर्माण होण्यासाठी आर्थिक, वैचारीक, सामाजिक, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा इत्यादी कारणे जबाबदार आहेत की यापेक्षा वेगळी कारणे आहेत हे शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

३) कोल्हापूर जिल्हा हा सहकारी चळवळीचे केंद्र आहे. त्यामुळे सहकारी संस्था आणि गटबाजीचे राजकारण यामध्ये काय संबंध आहे

हे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधात केला आहे.

४) काँग्रेस अंतर्गत गटबाजीचे राजकारणातुन काँग्रेसच्या संघटना बांधणीवर काय परिणाम झाला त्याचप्रमाणे गटबाजीतून काँग्रेसच्या राजकारणात राजकीय पोकळी निर्माण झाली काय ?

५) ह्या गटबाजीच्या राजकारणाचा जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक विकासावर काय परिणाम झाला ?

६) या गटबाजीमुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या एकूणच राजकीय प्रक्रियेवर कोणते सकारात्मक व नकारात्मक परिणाम झाले इत्यादी प्रश्नांचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

अन्वेषण पध्दती:
=============

प्रस्तुत शोध निबंध पूर्ण करण्यासाठी प्राथमिक साधनांचा, वेगवेगळया स्तरातील राजकीय पुढा-यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. हे मुलाखत घेतलेले पुढारी जिल्हा पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्था उदा. जिल्हापरिषद, तालुका पंचायत समिती, सहकारी संस्था व सहकारी साखर कारखाने इत्यादी क्षेत्रातून रँडम सॅम्पल पध्दतीने निवडण्यात आले होते. तसेच प्रबंधासाठी लागणारी आवश्यक माहिती गोळा करण्यासाठी प्राथमिक साधने त्यामध्ये सरकारी अहवाल, कागदपत्रे इत्यादीचाही वापर करण्यात आला. तसेच माहिती गोळा करण्यासाठी पुस्तके नियतकालीके व वर्तमानपत्रे इत्यादी सारख्या दुय्यम साधनांचाही वापर करण्यात आला. प्रबंधाचा कालखंड १९७७ ते १९८८ हा दहा वर्षाचा निवडण्यात आला. हा कालखंड निवडण्याचे कारण म्हणजे या कालखंडामध्ये जिल्हा पातळीवर काँग्रेसच्या विभाजनामुळे ही गटबाजी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

अधिक तीव्र झालेली दिसते. तसेच या कालखंडात सामाजिक व धार्मिक प्रश्नांना धरून काँग्रेस अंतर्गत जास्त तणाव निर्माण झाले आणि या सामाजिक, धार्मिक तणावांचा जिल्हा काँग्रेस पक्षावर काय परिणाम झाला हे शोधणे महत्त्वाचे वाटले. म्हणून हा कालखंड निवडण्यात आला. परंतु विषयाचे संपूर्ण आकलन होण्यासाठी १९७७ पूर्वीच्या काँग्रेस मधील राजकीय घडामोडींचाही संदर्भ घेण्याचा प्रयत्न केला आहे.

.......

# प्रकरण पहिले

## प्र स्ता व ना

## सं द र्भ सू ची


| | | |
|---|---|---|
| १) | कोठारी रजनी | : एकपक्ष प्रबळ पध्दती, इकॉनॉमिक अँड पॉलीटिकल विक्ली, १९७१, पृ.क्र. |
| २) | कॅरास मेरी | : डायनॅमिक्स ऑफ इंडियन पॉलिटीकल फॅक्शान्स, केंब्रिज युनिव्हर्सिटी, १९७२. |
| ३) | ब्रास पॉल | : फॅक्शनल पॉलिटीक्स इन इंडियन स्टेट. |
| ४) | कॅरास | : डायनॅमिक्स ऑफ इंडियन पॉलिटिकल फॅक्शान्स, केंब्रिज युनिव्हर्सिटी, १९७२. |
| ५) | थॉल रोझान | : सोर्सेस ऑफ डिसस्ट्रिक्ट कॉंग्रेस फॅक्शानॅलिजम इन महाराष्ट्र. इकॉनॉमिक ॲन्ड्पॉलीटीकल विक्ली, १९७२, पृ.क्र. १७२८. |
| ६) | उक्त | : पृष्ठ क्रमांक १७२८ |
| ७) | डॉ.बावीसकर बी.एस्. | : सोसियलॉजिकल बुलेटिन खंड,२०, नं. १ मार्च १९७१, पृ.क्र. ५४. |
| ८) | उक्त | : पृ.क्र. ५६. |


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

९) डॉ. बावीसकर बी.एस्. : इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल विक्ली,
३ मार्च १९६८, पृ.क्र. ४९२ ते ४९३.

१०) उक्त : पृष्ठ क्र. ४९२ ते ४९३.

.......